फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
पंजि. कार्यालय :- एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४००३६
वेबसाईट:www.fdcm.nic.in. ईमेल: md@fdcm.nic.in,gm.hq@fdcm.nic.in,
CIN:U45200MH1974SGCO17206
फोन नं.०७१२-२८११९६५,२८११९६३,२८११९५६,२८११९५१,२८११९४०,२८११९४६,२८११९२७,२८११९३०,२८११९३१

क्रमांक : प्रशा/आस्था-१/न.क्र.४६८/प्र.क्र.३४४/3658 नागपूर, दिनांक 20 JAN 2023

# आदेश

**विषय:-** वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गात तदर्थ तत्वावर पदोन्नत करण्यात आलेल्या वनपालांना, वनपाल या संवर्गात पुनर्स्थापित (Restore) करणेबाबत.

संदर्भ:-१) या कार्यालयाचे आदेश क्रं. प्रशा/आस्था-१/३७४४/३९६९ दिनांक ०२/३/२०१९
२) या कार्यालयाचे आदेश क्रं. प्रशा/आस्था-१/प्र.क्र.१५१/२०२०-२१/११३५ दिनांक १६/७/२०२१
३) या कार्यालयाचे आदेश क्रं. प्रशा/आस्था-१/प्र.क्र.१५१/२०२०-२१/१६०९ दिनांक २३/८/२०२१

व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील संदर्भ क्रमांक (१) च्या आदेशा नुसार श्री आर.एस. रोटे व श्री एम.एन. नंदेश्वर या दोन्ही वनपालांना वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गात ११ महिन्याकरिता तदर्थ तत्वावर पदोन्नती प्रदान करुन त्यांची पदस्थापना अनुक्रमे वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर उमरेड, नागपूर वन प्रकल्प विभाग व वनपरिक्षेत्र अधिकारी फिरते पथक गोंदिया वन प्रकल्प विभाग या पदांवर करण्यांत आली होती.

२.० त्यानंतर उक्त दोन्ही अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी प्राप्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने श्री आर.एस. रोटे यांचे स्थानांतरण टर्न की, वनपरिक्षेत्र वन प्रकल्प विभाग ठाणे व संदर्भ २ अनुसार श्री एम.एन. नंदेश्वर, यांचे स्थानांतरण जामडी-१, वनपरिक्षेत्र वन प्रकल्प विभाग, गोदिंया या पदावर करण्यात आले. उक्त आदेशाप्रमाणे श्री आर.एस.रोटे हे दिनांक १८.१०.२०२१ रोजी व श्री एम.एन. नंदेश्वर, हे दिनांक २९.०७.२०२१ रोजी उक्त पदांवर रूजू झाले आहेत. तेव्हापासून ते उक्त ठिकाणी कार्यरत आहेत.

३.० या दोन्ही वनपालांची भरती मुलत: वनरक्षक या संवर्गात झाली होती. कालांतराने त्यावेळच्या धोरणानुसार आरक्षणाचा लाभ घेऊन ते वनपाल या संवर्गात पदोन्नत झाले होते.

४.० वनपाल संवर्गातून वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गात पदोन्नती कोटयात पदोन्नती प्रदान करण्यासंदर्भात दिनांक ०९.०१.२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली. त्यात शासन निर्णय बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७.०५.२०२१ मधील दिशानिर्देशाच्या अधिन राहून पदोन्नतीकरीता निवड सूची तयार करण्यात आली. उक्त निवड सुचीत श्री एम. एन. नंदेश्वर यांचे नावाचा समावेश असून ते यथावकाश वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गात पदोन्नत होतील. तथापि श्री आर. एस. रोटे, यांच्या नावाचा समावेश उक्त निवड सुचीत नाही.

५.० उपरोक्त पार्श्वभूमीत उपरोल्लेखीत श्री आर.एस. रोटे व श्री एम.एन. नंदेश्वर यांना त्यांचे मुळ संवर्गात म्हणजे वनपाल या संवर्गात वेतन बँड एस-८ (रू.२५,५००-८१,१००) पुनर्स्थापित (Restore) करून वनपाल संवर्गात त्यांची पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | वनपालांचे नांव | वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील पदोन्नती कोट्यातील तदर्थ तत्वावर सध्याची पदस्थापना | वनपाल संवर्गातील पुन:स्थापन होऊन पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री एम.एन. नंदेश्वर, | जामडी-१ वनपरिक्षेत्र वन प्रकल्प विभाग, भंडारा. | वनपाल जामडी-२, विक्री आगार, जामडी-२ परिक्षेत्र, वन प्रकल्प विभाग, भंडारा |
| २ | श्री आर.एस. रोटे, | टर्न की, वनपरिक्षेत्र वन प्रकल्प विभाग, ठाणे | वनपाल चिंबीपाडा, शिरसाड परिक्षेत्र, वन प्रकल्प विभाग, ठाणे |

६.० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येईल.

७.० संबंधित नियंत्रक अधिका-यांनी उक्त वनपालांना त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणेकरिता तात्काळ कार्यमुक्त करावे.

(विकास गुप्ता)
व्यवस्थापकीय संचालक

प्रति,

१) श्री आर. एस. रोटे,वनपाल
वन प्रकल्प विभाग ठाणे.

२) श्री एम. एन. नंदेश्वर, वनपाल
वन प्रकल्प विभाग भंडारा.

प्रतिलीपी:- महाव्यवस्थापक, एफडीसीएम, लिमीटेड, नागपूर प्रदेश नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.

प्रतिलीपी:- प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड, नाशिक प्रदेश/चंद्रपूर प्रदेश यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.

प्रतिलीपी:- विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग ठाणे/भंडारा/चंद्रपूर/नाशिक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.

प्रतिलीपी:- आदेश नस्ती/ एफडीसीएमचे अधिकृत संकेतस्थळ www.fdcm.nic.in